# दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM)

## अंतर्गत राबविण्यात येणा-या योजनेची संक्षिप्त माहिती

१) **सामाजिक अभिसरण व संस्थात्मक बांधणी. (Social Mobilization and Institutional Development) -** या उपांगाअंतर्गत स्वयंसहाय्य समुह (बचतगट) तयार करणे. शहरी गरीबांचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने १० ते २० महिला पुरुषांचे बचतगट तयार करणे, प्रभागातील अथवा स्थापित सर्व स्वयंसहाय्य समुह (१० ते २० बचतगट) यांचे वस्तीस्तर संघ स्थापन करणे. सर्व वस्तीस्तरसंघांचे शहर स्तरावरील समुह स्थापन करणे. क्षमता बांधणी बँक लिंकेज समुहांना उद्योग उभारण्यासाठी मदत व मार्गदर्शन करणे इ. कामे

२) **कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगाराची उपलब्धता. (Employment Through Skill Training & Placement) -** या अभियाना अंतर्गत शहरी गरीब व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी वॉर्ड प्रभाग निहाय शहरातील एकूण लोकसंख्येतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती टक्केवारीच्या प्रमाणात असलेल्यांना किमान अनुसूचित जाती/जमातीच्या प्रशिक्षणार्थ्यांचा शोध घेणे, त्यांचे अर्ज भरणे, त्यांना प्रशिक्षण देणे. शहरातील लाभार्थ्यांपैकी कमीतकमी ३०% महिला लाभार्थी, १५% अल्पसंख्यांक लाभार्थी व ३% अपंग लाभार्थी यांचा शोध घेऊन त्यांचा अर्ज भरणे, प्रशिक्षण निवडीसाठी मार्गदर्शन करणे इ. कामे

३) **स्वयंरोजगार कार्यक्रम. (Self Employment Programme) -** या अभियाना अंतर्गत आवश्यक ते कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन बाजाराच्या गरजेनुसार शहरी गरीबांना त्यांचे जीवनमानाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शहरी गरीब लाभार्थी अनुसूचित जाती/ जमाती, अल्पसंख्यांक, अपंग या प्रवर्गातील लाभार्थ्यांची वॉर्ड/ प्रभाग निहाय निवड करणे, व्यवसाय संबंधी मार्गदर्शन करणे, संपूर्ण कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेत प्रस्ताव सादर करणे इ.कामे

४) **फेरीवाल्यांना सहाय्य. (Support to Urban Street Vendors) -** या अभियाना अंतर्गत प्रकल्प शहरातील स्थिर व अस्थिर व्यवसाय करणा-या फेरीवाल्यांच्या बाजाराच्या गरजेच्या आधारावर कौशल्य विकास प्रशिक्षण देणे, त्यांची यादी अद्यावत ठेवणे, शहरातील फेरीवाल्यांना त्यांची शैक्षणिक पात्रता, मर्यादित कौशल्य व आर्थिक पत यामुळे व्यवसायाच्या संधी कमी उपलब्ध असतात. यामुळे असंघटित आणि स्वयंरोजगार करणा-या फेरीवाल्यांना व्यवसायाच्या व्यापक संधी उपलब्ध करुन देणे, त्यांना कार्यकुशल बनविणे, त्यांना पत मिळविण्यास समर्थ बनविणे, तसेच त्यांची व त्यांच्या कुटूंबियांची सामाजिक सुरक्षितता, सामाजिक कल्याण व शासकीय योजनांशी सांगड घालणे इ.

- **अ) फेरीवाल्यांचे सर्वेक्षण व त्यांना ओळखपत्र देणे.**
- **ब) शहरी फेरीवाला आराखडा तयार करणे.**
- **क) शहरामध्ये फेरीवाला क्षेत्र तयार करुन त्यासाठी पायाभूत सुविधा देणे.**
- **ड) फेरीवाल्यांना प्रशिक्षण देणे व त्यांचा कौशल्य विकास करणे.**
- **इ) पत मिळविण्यास समर्थ बनविणे.**
- **ई) सामाजिक सुरक्षा योजनांशी त्यांची सांगड घालणे.**

तसेच बायोमेट्रीक सर्वेक्षणाअंती पात्र लाभार्थ्यांना ओळखपत्र तसेच प्रमाणपत्र देणे, सर्व पात्र फेरीवाल्यांची यादी तयार करणे, वॉर्ड/प्रभाग निहाय प्रसिध्दी करणे इ. कामे

५) **शहरी बेघरांसाठी निवारा. (Scheme of Shelter for Urban Homeless) -**निवारा ही मानवाची मूलभूत गरज असल्याने अत्यंतिक गरीब व्यक्तीला या उपांगातर्गत मूलभूत सुविधा असलेल्या कायमस्वरुपी निवा-याची व्यवस्था या उपांगाद्वारे उपलब्ध केली जाईल. प्रत्येक १ लक्ष लोकसंख्येसाठी ५० ते १०० बेघर व्यक्तींना आश्रय देण्याकरीता एक निवारा उपलब्ध केला जाईल. सन २०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारे पहिल्या टप्प्यात ज्या शहरांची लोकसंख्या १ लाखापेक्षा जास्त आहे, त्या शहरांमध्ये हा उपांग राबविला जाईल.

**या उपांगाचे उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहे :-**

१) नागरी गरीब बेघरांना मूलभूत सोयी व सुविधा उदा. पाणी, स्वच्छता, सुरक्षितता, लाईट इत्यादी उपलब्ध केलेले निवारे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार उपलब्ध करणे.

२) नागरी गरीब बेघरांपैकी मुख्यत: लहान मूल, महिला, वयोवृध्द व्यक्ती, अपंग व्यक्ती, आजारी व्यक्तींना निवा-याची सोय उपलब्ध करणे.

३) संबंधितांना, सामाजिक सुरक्षितता, निवृत्ती वेतन व शासनाच्या इतर योजनांचा लाभ ही त्या अनुषंगाने उपलब्ध करणे.

# वसई विरार शहर महानगरपालिका
# दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM)
## कार्यरत अधिकारी व कर्मचारी

१) श्री. अजिज शेख - उप आयुक्त तथा शहर प्रकल्प अधिकारी
२) श्री. संजय हिनवार - सहा. प्रकल्प अधिकारी (DAY-NULM)
३) श्रीम. विभा जाधव - व्यवस्थापक सामाजिक विकास व पायाभूत सुविधा (DAY-NULM)
४) श्री. राकेश पाटील - शहर व्यवस्थापक वित्तिय समावेशक व लघु व्यवसाय (DAY-NULM)
५) श्री. पंकज चव्हाण - शहर व्यवस्थापक माहिती संनियंत्रण प्रणाली व मुल्यांकन (DAY-NULM)
६) श्रीम. गिता गवते - समुदाय संघटक (DAY-NULM)
७) श्रीम. रेणुका भांगरे - समुदाय संघटक (DAY-NULM)
८) श्रीम. योगिता पाटील - संगणक चालक (DAY-NULM)
९) श्री. शिवाजी पालांडे - शिपाई (DAY-NULM)